(महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त)
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित

उपकार शिक्षण संस्था, नागपुर व्दारा संचालित

# वाय. एस. पवार कला महाविद्यालय

नेरी, ता. चिमुर, जि. चंद्रपुर

## कला शाखा










आमचे उपक्रम : शिक्षण, स्वास्थ्य व स्वच्छता!!!

Scanned with OKEN Scanner

## अध्यक्षांचे मनोगत



श्री वाय. एस. पवार

अध्यक्ष

उपकार शिक्षण संस्था, नागपुर

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, त्याकरिता तळा गाळातील लोकांपर्यंत शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठीच आम्ही या भागात शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवण्यासाठीच सदरहू शिक्षण संस्थेची निर्मीती करुन, सुजाण नागरिक निर्माण करणे हेच आमचे उद्दिष्ट ठरविले आहे. शिक्षणामुळेच, त्यातही दर्जेदार शिक्षणामुळेच मानवाचं व्यक्तित्व घडत असतं. म्हणूनच शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविणे नव्हे तर एक सकारात्मक वैचारिक जडण घडण करु शकणारी प्रणाली आहे. त्या प्रणालीला कार्यान्वित करणेच आमचे ध्येय आहे. शिक्षण ही सातत्याने चालत राहणारी प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया कधीच थांबू नये हाच आमचा मानस आहे.

## सचिवांचे मनोगत

शिक्षण ही सातत्याने चालत राहणारी प्रक्रिया असून मानव घडविण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. असे असले तरीही ग्रामीण आणि दुर्गम भांगात शिक्षणाच्या पाहिजे तशा सुखसुविधा उपलब्ध होवू शकल्या नाहीत ही अत्यंत शोच्यनिय अशी बाब आहे. मी स्वतः ग्रामीण भागाशी जुळलेला असल्यानेच नेरी सारख्य ग्रामीण भागात सर्व सुखसुविधांनी सज्ज असलेली शिक्षणसंस्था उभारण्याचा मानस घेवूनच वाय. एस. पवार महाविद्यालयाची निर्मिती केलेली आहे. ही संस्था म्हणजे केवळ पदवी मिळवून देणारी संस्था न ठरता ती एक आदर्श संस्था ठरावी आणि या संस्थेतून शिक्षण घेवून बाहेर पडणारे विद्यार्थी केवळ पदवीधरच नसावेत तर आपल्या मनाची सुयोग्य जडण–घडण करुन एक जबाबदार व स्वतःच्या पायावर भक्कमपणे, सक्षमतेने उभा राहण्याची ताकद निर्माण करणारा माणूस घडविणे हे आमचे ध्येय आहे आणि त्यासाठी आम्ही या संस्थेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक सर्व सुख सुविधा पुरवून त्यांच्यामध्ये सचेतन मन निर्माण करण्यासाठी जे जे प्रयत्न आवश्यक असतील ते पूर्ण केल्या शिवाय आम्ही क्षणभर ही थांबणार नाही.



श्री राजकमल चवरे

संस्थापक, सचिव

उपकार शिक्षण संस्था, नागपुर

Scanned with OKEN Scanner

(महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त)
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित

उपकार शिक्षण संस्था नागपुर व्दारा संचालित


# वाय. एस. पवार कला महाविद्यालय

कला शाखा

नेरी, ता. चिमुर, जि. चंद्रपुर

आमचे उपक्रम : शिक्षण, स्वास्थ्य व स्वच्छता!!!

Scanned with OKEN Scanner



## दृष्टिकोन

- दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा पुरविणे.
- संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविणे.
- सुविद्य व सुज्ञ विद्यार्थी अन भविष्याचा वेध घेणारे विद्यार्थी घडविणे.
- रोजगार निर्मितीसाठी सक्षम विद्यार्थी घडविणे.
- सुयोग्य मार्गदर्शकांची सुविधा उपलब्ध करुन देणे.

## उद्दिष्ट

- गरिब आणि होतकरु विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- सुजाण नागरिक घडविणे.
- नाविण्यपूर्ण अध्ययन, अध्यापन व संशोधन करणारे विद्यार्थी घडविणे.
- संस्कृति व संवर्धनाची जडण घडण करुन मानवतावाद जपणारे विद्यार्थी घडविणे.
- विपरित परिस्थितीत संघर्षाची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
- निर्माण क्षमात, समालोचन आणि संशोधन क्षमता असलेले विद्यार्थी घडविणे.
- जबाबदारी, सामाजिक जाण, व्यवस्थापन आदी गुणांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
- स्वतः ची व संस्थेची आगळीवेगळी प्रतिमा निर्माण करणारे सक्षम विद्यार्थी घडविणे. स्त्री शिक्षणाला विशेष सवलती देणे.



Scanned with OKEN Scanner



## प्रवेशासंबंधी सूचना

**१. शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (ट्रान्सफर सर्टिफिकेट / लिव्हींग सर्टिफिकेट)**
विद्यार्थी यापूर्वी ज्या शाळेत/महाविद्यालयात शिकत होता त्या शाळेच्या/महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकाची /प्राचार्यांची सही असलेले शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.

**२. परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र :** अर्जदाराने उत्तीर्ण केलेल्या शेवटच्या परीक्षेचा स्पष्ट उल्लेख असलेला व रीतसर प्रमाणित केलेला समाधानकारक पुरावा.

**३. गुणपत्रिका (मार्कलिस्ट) :** मागील परिक्षेच्या प्रत्येक विषयात मिळालेल्या गुणांचा उल्लेख असलेली व मुख्याध्यापक विद्यापीठाचे अधिकारी, प्राचार्य किंवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे कार्यवाह यांच्या सहीच्या प्रमाणपत्राची सत्य प्रतिलिपी सोबत जोडावी लागेल.

**४. चांगल्या वर्तणूकीचे प्रमाणपत्र (कॅरेक्टर सर्टिफिकेट) :** मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्या सहीचे विद्यार्थ्यांची वर्तणूक चांगली असल्याबद्दलचे प्रमाणपत्र

**५. स्थानांतरण आणि पात्रता प्रमाणपत्र (मायग्रेशन ॲण्ड इलिजीबिलीटी सर्टिफिकेट) :** गोंडवाना विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठाचे अंतर्गत विद्यापीठ परीक्षा उत्तीर्ण केली असलेल्या बाबतीत स्थानांतरण प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) अशा विद्यार्थ्यांनी १० ऑगस्ट पर्यंत अथवा विद्यापीठाने ठरविलेल्या मुदतीपर्यंत हे प्रमाणपत्र कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे. अन्यथा मिळालेला प्रवेश रद्द केला जाईल. या सोबत विद्यार्थ्याला रू. ६०/– स्थायीत्व शुल्क भरावे लागेल. हे प्रमाणपत्र ठरलेल्या दिनांकापेक्षा उशिरा आणल्यास शुल्क भरुन पुन्हा प्रवेश घ्यावा लागेल. महाराष्ट्रातील विद्यार्थ्याव्यतिरिक्त हे शुल्क रू. १००/– राहील. (Other State Fee)

**६. महाविद्यालयात घेतलेला प्रवेश विद्यापीठाची मान्यता मिळेपर्यंत तात्पुरता राहील.**



Scanned with OKEN Scanner

**प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्राच्या मूळ प्रती दाखविणे आवश्यक आहे.**

निवडलेल्या विषयात व माध्यमात शैक्षणिक सत्रातील ३० सप्टेंबर २०१७ नंतर बदल करता येणार नाही. प्रवेश देणे किंवा नाकारणे प्रवेश समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील व या संदर्भात प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

**८. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश अर्जात निवडलेला विषय विभागप्रमुख व प्राचार्य यांच्या लिखितरूपातील परवानगीशिवय बदलता येणार नाही.**

**९. आधार कार्ड किंवा आधार कार्ड प्रक्रियेत असल्याची पावती तसेच तीन पासपोर्ट साईज फोटो आणि जातीचे प्रमाणपत्र देणे गरजेचे आहे.**

# वरिष्ठ महाविद्यालया अंतर्गत विनाअनुदानित तत्वावर अभ्यासक्रम

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्रिवर्षीय पदवी पाठ्यक्रम

## कला शाखा

### बी. ए. भाग १

अ) अनिवार्य विषय

१. इंग्रजी (English) २. मराठी (Marathi)

ब) ऐच्छिक विषयांपैकी कोणतेही तीन

१) अर्थशास्त्र (Economics) २) राज्यशास्त्र (Political Science)

३) इतिहास (History) ४) समाजशास्त्र (Sociology)

५) इंग्रजी साहित्य (English Literature) ६) मराठी साहित्य (Marathi Literature)

७) गृह अर्थशास्त्र (Home Economics) **(फक्त मुलींकरिता)**

**प्रवेशित विद्यार्थ्यांना** Environmental Studies **(पर्यावरणात्मक अभ्यास) हा विषय अनिवार्य आहे.**

**टिप :** महाराष्ट्र शासन व गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली च्या नियमानुसार विद्यार्थीसंख्या पुरेशी नसल्यास तो अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

# सर्वसाधारण सूचना

१. महाविद्यालयातील कोणत्याही वर्गातील प्रवेशाबाबतचा निर्णय सामान्यत: संबंधित प्रवेश समिती घेईल. अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.

२. महाविद्यालयात विविध वर्गासाठी राखीव जागा शासनाच्या आदेशानुसार राखून ठेवल्या जातील.

३. खालील कारणांमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे नाव महाविद्यालयाच्या हजेरी पटावरून काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

(अ) महाविद्यालयाच्या शुल्काचा योग्य वेळेस भरणा न करणे. (आ) आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेस न पोहोचणे. (इ) प्राचार्यांच्या मते असमाधानकारक वर्तणूक असणे (ई) आवश्यक प्रमाणपत्रे विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शेवटच्या मुदतीपर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयात न देणे.

४. विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश अवैध अथवा नियमबाह्य ठरल्यास त्याने भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.

५. विद्यार्थ्याला कोणत्याही सबबीवर कोणतेही मूळ प्रमाणपत्र महाविद्यालयातून परत मिळणार नाही. कार्यालयात अर्ज केल्यास सत्य प्रतिलिपी किंवा झेरॉक्स प्रत मिळू शकेल. त्यासाठी वेगळे शुल्क आकारले जाईल.

६. एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने दिलेले संस्था सोडल्याचे प्रमाणपत्र (ट्रान्सफर सर्टिफिकेट) परत मिळणार नाही. त्याची सत्य प्रतिलिपी किंवा झेरॉक्स प्रत मिळू शकेल. त्यासाठी वेगळे शुल्क आकारले जाईल.

७. गेल्या वर्षी महाविद्यालय सोडून गेलेल्या किंवा विद्यापीठाची परीक्षा अनुत्तीर्ण होऊन त्याच वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे वा न देणे हे प्रवेश समिती व प्राचार्य यांच्यावर अवलंबून राहील.

८. प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती फॉर्म किंवा फ्रिशीप फॉर्म भरणे अनिवार्य आहे. न भरल्यास शिकवणी शुल्क (Tuition Fees) आणि महाविद्यालयीन शुल्क भरावे लागेल.



Scanned with OKEN Scanner

**शुल्कासबंधी विशेष सूचना :**

१. माहितीपत्रकात दिल्याप्रमाणे सर्व शुल्क प्रवेश मिळताच आवेदन पत्रासोबत ताबडतोब भरावे लागेल. प्रवेश घेतल्यानंतर काही कारणाने प्रवेश रद्द करावयाचा झाल्यास आवेदनपत्रासोबत भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

२. एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याने कोणत्याही कारणाने महाविद्यालयात येणे बंद केल्यास किंवा महाविद्यालय सोडल्यास त्या वर्षाचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल. त्याशिवाय विद्यार्थ्याला कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.

३. जाहिर केलेल्या तारखेपर्यंत शुल्क न भरल्यास विद्यार्थ्याचे नाव हजेरी पटावरून काढले जाऊ शकेल. त्यानंतर पुन्हा प्रवेश देणे वा न देणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार प्रवेश समीतीचा राहील.

४. शुल्कात वेळोवेळी होणारा बदल प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास लागू राहील.


५. एका विद्याशाखेत (फॅकल्टीत) प्रवेश घेतल्यानंतर दुसऱ्या विद्याशाखेत प्रवेश घ्यावयाचा असल्यास विद्यार्थ्याला प्रवेश शुल्क व इतर शुल्क भरावे लागेल.

६. विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना आपले सर्व प्रकारचे देय शुल्क परीक्षेचे आवेदन पत्र भरण्यापूर्वी किंवा निदान परीक्षा शुल्कासोबत तरी भरले पाहिजे. शुल्क न भरल्यास महाविद्यालयातून नाव काढले जाईल.



Scanned with OKEN Scanner

## महाविद्यालयीन परीक्षा :



विद्यापीठाच्या परिक्षाव्यतिरिक्त प्रत्येक विषयाच्या घटकानुसार चाचण्या सबंधित विषयांचे प्राध्यापक घेतील. तसेच महाविद्यालयाची सराव परीक्षा घेतली जाईल. परिक्षेला गैरहजर राहिल्यास परीक्षा समिती निर्धारित करेल तो दंड विद्यार्थ्याला प्रती पेपर भरणे बंधनकारक राहील.

## उपस्थिती :

विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विषयाच्या व्याख्यानांना व प्रात्यक्षिकांना विद्यार्थ्याची उपस्थिती ७५% असणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यार्थ्याला परीक्षेस बसता येणार नाही. योग्य कारणाशिवाय अनुपस्थित राहिल्यास महाविद्यालयाने ठरविल्याप्रमाणे दंड होईल. महाविद्यालयीन वेळेत विद्यार्थ्यांनी खाजगी शिकवणी वर्गात जाऊ नये.

* शारीरिक शिक्षण यासाठी देखील उपस्थिती ७५% टक्के असणे अनिवार्य आहे.
* खेळाच्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ते खेळ खेळतात ही सबब वर्गातील उपस्थितीत सूट मिळण्यास मुळीच चालणार नाही.
* वैद्यकीय दाखला देणे किंवा पाठ्येतर कार्यक्रमात भाग घेणे या सबबी अनुपस्थितीसाठी कारणे म्हणून चालणार नाहीत.
* महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी ठरविलेल्या किमान शैक्षणिक दर्जाला न पोहचू शकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परिक्षेला बसू दिले जाणार नाही.

## गणवेष :

- सर्व विद्यार्थ्यांनी पॅन्ट व फिक्कट/पांढऱ्या रंगाचा शर्ट वापरावा. चित्रविचित्र डिजाईन्स आणि मजकूर लिहीलेली जर्सी वापरु नये.



Scanned with OKEN Scanner

- सर्व विद्यार्थीनींनी सलवार कमीज किंवा साडी ब्लाऊज वापरावा. भडक कपडे वापरु नये. तसेच दागिने वगैरे महाविद्यालयाच्या परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने घालून येऊ नये.

**महाविद्यालयाचे ओळखपत्र :**

- प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने पावती दाखवून महाविद्यालयाचे कार्यालयातून कोरे ओळखपत्र घ्यावे. त्यावर स्वत:चे छायाचित्र लावून प्राचार्याची सही घ्यावी, शेवटची तारीख संपल्यानंतर ओळखपत्रावर सही मिळणार नाही. ओळखपत्र नेहमी जवळ असणे आवश्यक आहे. प्रयोगशाळा, कार्यालय या ठिकाणी मागितल्यास ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.
- प्रवेश घेतेवेळी ओळखपत्र घेणे अनिवार्य राहील. ओळखपत्राशिवाय महाविद्यालयाच्या परिसरात प्रवेश करता येणार नाही.

**ग्रंथालय :**

महाविद्यालयाचे ग्रंथालय सर्व दृष्टीने सुसज्ज आहे. ग्रंथालयात अभ्यासाची पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिके, दैनिके उपलब्ध आहेत. त्यासंबंधी ग्रंथालयातून वेळोवेळी प्रसारित केलेल्या सूचनाप्रमाणे व नियमाप्रमाणे त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. ओळखपत्राशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही. महाविद्यालयाची सर्व पुस्तके वार्षिक परीक्षेचे प्रवेशपत्र घेण्यापूर्वी परत करावी लागतील. यानंतर पुस्तके लागल्यास पुस्तकांची पूर्ण किंमत अनामत रक्कम म्हणून ठेवून पुस्तके मिळू शकतील. त्यासंबंधीचे निर्णय प्राचार्यांच्या आदेशानुसार ग्रंथपालावर अवलंबून राहील. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी अत्याधुनिक साहित्य जसे कॉम्प्युटर, इंटरनेट इत्यादि सोयी उपलब्ध आहेत.

**ग्रंथालया संबंधी विद्यार्थ्यांकरीता सूचना :**

१. विद्यार्थ्यांना १५ दिवसाच्या मुदतीने पुस्तके दिली जातात. मुदतीनंतर पुस्तके विद्यार्थ्यांकडे राहिल्यास प्रतिदिवस प्रती पुस्तक १ रुपया दंड आकारल्या जाईल.

२. पुस्तकांवर कसल्याही खुणा, अधोरेखांकित करण्याची, लिहिण्याची, पाने फाडण्याची सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास पुस्तकांची दुप्पट किंमत वसूल केल्या जाईल. विद्यार्थ्यांनी पुस्तक नेतांना सुस्थितीत असल्याबाबत खात्री करून घ्यावी. सुस्थितीत नसल्यास ग्रंथपालास दाखवून दयावे अन्यथा त्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहिल.



Scanned with OKEN Scanner



**खेळ व क्रीडा :**

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक प्रगती करण्यासाठी पूर्ण वाव मिळेल. महाविद्यालयात क्रिकेट, फुटबॉल, हॅण्डबाल आणि बास्केट बॉल, इत्यादी खेळांच्या सोयी उपलब्ध आहेत. आंतर महाविद्यालयीन खेळ व क्रीडांच्या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना निवड मंडळाची अनुमती घ्यावी लागेल.

## शैक्षणिक सवलती



**E.B.C. सवलत (आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता)**

१. E.B.C. सवलत पुढे चालू असे दोन अर्ज सत्र २०१७–२०१८

२. उत्पन्नाचे दाखले (विद्यार्थ्यांचे वडिलांचे संपूर्ण नांव व उत्पन्नाचे वर्ष २०१६–२०१७) वार्षिक उत्पन्न १५०००/– त्यावर शहरी विभागाकरीता विशेष कार्यकारी दंडाधिकारी/ग्रामीण विभागाकरीता सरपंच यांचे सही व शिक्के (दाखल्यामधे खोडतोड चालणार नाही.)

३. रेशन कार्डच्या पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स

४. टी.सी. व गुणपत्रिकेची झेरॉक्स.

५. जिल्हा बदलला असल्यास जिल्हा बदली प्रमाणपत्र.

६. शिक्षणात खंड पडल्यास, खंड प्रमाणपत्र (त्यावर तहसिलदाराचा सही व शिक्का)

७. वडील मरण पावले असतील तर मृत्यु झाल्याबाबतचा दाखला.
८. EBC आदेश क्रमांक व दिनांकाचे मागील वर्षी मंजूरीचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे सहीचे.
९. चवथ्या अपत्यास इ.बी.सी. मिळणार नाही.
१०. राष्ट्रीयकृत बँकेच्या खातेपुस्तकाची सत्यप्रत आणि आधार कार्डची सत्यप्रत

**जी. ओ. आय. शिष्यवृत्ती संबंधी (NB / SC / ST / VJ NT / SBC / OBC विद्यार्थ्यांकरिता)**

१. पासपोर्ट साईजचा विद्यार्थ्यांचा फोटो.
२. विद्यार्थ्यांच्या वडिलांचा व्यवसाय शेती किंवा रोजमजुरी असल्यास वार्षिक उत्पन्नाचा (उत्पन्नाचे वर्षे २०१६-२०१७) मूळ दाखला तहसिलदार यांच्या सही शिक्क्याचा असला पाहीजे.
३. नवीन नमुन्यातील जातीचे प्रमाणपत्राच्या छायाप्रत सत्य प्रतिलिपी.
४. दहावीच्या गुणपत्रिकाची छायाप्रत सत्य प्रतिलीपी.
५. सर्व गुणपत्रिका म्हणजे पास-नापासच्या छायाप्रत सत्य प्रतिलीपी.
६. मागील वर्षीच्या टी.सी. ची छायाप्रत (सत्य प्रतिलीपी.)
७. शिक्षणात खंड पडल्यास मूळ खंड प्रमाणपत्र तहसिलदार यांच्या सहीशिक्क्यानिशी खंड काळात जी. ओ. आय. शिष्यवृत्ती घेतली नाही असे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.
८. जिल्हा बदली प्रमाणपत्र-जिल्हा बदलला असल्यास पूर्वीच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारीऱ्यांच्या सही शिक्क्याने.
९. जी. ओ. आय. शिष्यवृत्ती ऑर्डर नंबर व 'डेट'चे प्राचार्य यांच्या सही शिक्क्याचे प्रमाणपत्र संपूर्ण माहिती असलेले (मागील वर्षाचे) अतिशय आवश्यक आहे.
१०. वडील मरण पावल्यास मृत्यू बाबतचा दाखला.
११. राष्ट्रीयकृत बँकेच्या खातेपुस्तकाची सत्यप्रत आणि आधार कार्डची सत्यप्रत
१२. **OBC / SBC / VJ NT / NTD** इत्यादी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नॉनक्रिमिलीअर आवश्यक.

टीप :

१. SC, ST, OBC, SBC आणि VJNT या संवर्गातील विद्यार्थ्यांकरीता GoI Scholarship करीता उत्पन्न मर्यादा रू १,००,०००/-.



Scanned with OKEN Scanner

**वाहन स्टँड**

सायकल, मोटर सायकल, स्कुटर, मोपेड इ. वापरणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी नेमून दिलेल्या जागेवरच ही वाहने कुलूप लावून ठेवावी. इतर ठिकाणी वाहने ठेवता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सायकली, स्कुटर्स, मोपेड इत्यादींसाठी निर्धारीत वार्षिक शुल्क द्यावे लागेल. हे शुल्क सायकल स्टँडच्या व्यवस्थेसाठी राहील. स्टँडचा बिल्ला काढावा व हा बिल्ला जवळ बाळगावा लागेल. चोरी गेलेल्या वाहनाची भरपाई महाविद्यालयाकडून मिळणार नाही. सर्व विद्यार्थ्यांनी स्वतःच्या वाहनाचा विमा उतरवून घ्यावा.

**विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी विशेष सूचना**

१. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सामानाला हानी पोहचेल असे कुठलेही कृत्य करु नये.

२. महाविद्यालयाच्या इमारती, विद्युत व्यवस्था यामध्ये बिघाड किंवा खिडक्याची तावदाने फोडणे, भिंतीवर लिहीणे, पोस्टर्स चिकटविणे असे कुठलेही कृत्य करु नये.

३. महाविद्यालयाच्या परिसरात धूम्रपान करणे, पान खाणे, गुंगी आणणारे पेय व औषधे यांचा वापर करणे यास सक्त मनाई आहे.

४. महाविद्यालयाचे बगीचातील फुले तोडणे, रोपे उपटणे, वृक्ष, वेली यांचे कोणत्याही प्रकारे नुकसान करू नये.

५. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थेसंबंधीची माहिती प्रसिद्धीकरिता देता कामा नये.

६. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात अनधिकृत व्यक्तींना आणू नये.

७. महाविद्यालयाच्या परिसरात अथवा महाविद्यालयाच्या नावावर कोठेही राजकीय चळवळी व हिंसात्मक निदर्शने करण्यास सक्त मनाई आहे.

८. सूचना फलकावरील प्रत्येक सूचना विद्यार्थ्याने वाचणे आवश्यक आहे. सूचना न वाचल्यामुळे विद्यार्थ्याचे नुकसान झाल्यास त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

९. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील परिसरामध्ये मोबाईल आणू नये. महाविद्यालयीन परिसरात मोबाईलचा वापर करतांना आढळल्यास रू. ५०/– दंड आकारण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

१०. विद्यार्थ्यांच्या कायमच्या अथवा स्थानिक पत्त्यात बदल झाल्यास तसे महाविद्यालयाच्य कार्यालयात लेखी कळवावे.

११. विद्यार्थी वर्गात सतत गैरहजर राहिल्यास त्याला दंड आकारण्यात येईल. तसेच त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल

**रॅगींग करणे हा दंडनीय अपराध असून अपराध्यास कठोर शिक्षेची कायद्यानुसार तरतूद करण्यात आली आहे.**



पालकांना विशेष सूचना

१. पालकांनी कृपया विद्यार्थ्यांच्या उपस्थिती विषयीचे, देय शुल्काबद्दलचे व वर्तनाबद्दलचे नियम काळजीपूर्वक वाचावेत व त्यानुसार आपल्या पाल्याचे आचरण राहण्याविषयी अत्यंत दक्ष असावे.

२. महाविद्यालयाच्या परीक्षांना विद्यार्थ्याने बसणे व उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यास विद्यापीठाच्या परीक्षेस बसण्याची अनुमती मिळणार नाही.

३. विद्यार्थ्यांच्या उपस्थिती व प्रगतीविषयीचा आढावा पालकांनी घेणे आवश्यक आहे. त्यासंबंधी संस्थेने दिलेल्या सूचनांची पालकांनी दखल घ्यावी.

४. विद्यार्थ्यांसंबंधी विवाद उपस्थित झाल्यास प्राचार्यांच्या निमंत्रणानुसार पालकांची उपस्थिती अनिवार्य आहे.

५. पालकांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात भ्रमणध्वनी घेवून पाठवू नये. विद्यार्थ्यांजवळ भ्रमणध्वनी आढळल्यास विद्यार्थ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

६. विद्यार्थी रॅगींग च्या कारवाईत आढळल्यास त्यास कायद्यानुसार शिक्षा होईल याची जाणीव आपण आपल्या पाल्यास करून द्यावी.

## विशेष सूचना

१. महाविद्यालयाच्या विभिन्न शाखेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे म्हणून संबंधित विषयाच्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात शैक्षणिक अडीअडचणी असल्यास संबंधित प्राध्यापकांशी विद्यार्थ्यांना चर्चा करता यावी याकरीता खाली वेळात प्राध्यापक महाविद्यालयात उपलब्ध राहतील. यावेळेत प्राध्यापकांना पिरीएड नसतांना विद्यार्थ्यांनी भेटून आपल्या अभ्यासविषयक अडचणींचे निरसन करुन घ्यावे.

विद्यार्थ्यांनी स्वतःचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याचा हेतूने या वेळात प्राध्यापकांना जेव्हा पिरीएड नसतील अशा तासात भेटून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा.

२. शासन व विद्यापीठ नियमानुसार, अनुदानित अथवा विनाअनुदानित वर्गात किमान प्रवेशीत विद्यार्थी संख्या पूर्ण न झाल्यास असे वर्ग वा अभ्यासक्रम बंद करण्याचे अधिकार उपकार शिक्षण संस्था नागपुर-२७ यांना राहतील.



Scanned with OKEN Scanner

# उपकार शिक्षण संस्थेचे उपक्रम

१. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन

२. परिचारिका प्रशिक्षण

३. संगणक प्रशिक्षण







Scanned with OKEN Scanner

# विद्यापीठ गीत

गोंडवाना नव तपोवन अदिजन वन परिसरी
विश्वविद्यापीठ हे ज्ञानार्चना या मंदिरी ।।धृ।।

स्त्रोत अदिम संस्कृताचा या प्रदेशी निर्मळ
शास्त्र, विद्य अन् कलेतून अमृताचे ओहळ
त्या झऱ्यांनी करुनि विकसित मिळवू विद्यासागरी ।।१।।

शास्त्र, वाङःमय, तंत्रविद्या व्यावसायिक ज्ञानही
अर्थ वा वाणिज्य क्रिडा अन् कला विज्ञानही
नित इथे बहरेल प्रतिमा नव युवांच्या अंतरी ।।२।।

ज्ञानगंगा पुण्यवान जीव तिजसंगे शिव
उचित संस्कारेच जगती श्रेष्ठ ठरतो मानव
ऊंच, उन्नत झेप, घेतील छात्र इथले अंबरी ।।३।।


दलित, पीडित, दीन, शोषित सर्व जाती बांधव
ज्ञानपीठी या निमत्रित शिक्षणोत्सुक मानव
प्राप्त विद्येनेच मनुजा अभयुदय या भूवरी ।।४।।

बन्धुता, स्वातंत्र्य, समता, न्यानीतीला जपावे
विश्वशांतीस्तव नवे आव्हान हे पेलून घ्यावे
ज्ञान, अस्त्रांनीच निश्चित विजय जीवन संगरी ।।५।।



Scanned with OKEN Scanner

उपकार शिक्षण संस्था, नागपुर
व्दारा संचालित




Scanned with OKEN Scanner

उपकार शिक्षण संस्था, नागपुर
व्दारा संचालित

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित
(महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त)

# वाय. एस. पवार
# कला महाविद्यालय


नेरी, ता. चिमुर, जि. चंद्रपुर

Mob. : 7218223613, 7350745241

Email : yspcollegeneri@gmail.com


Scanned with OKEN Scanner